


दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
बीड – महाराष्ट्र | गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ४२ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये
RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com




# अजित पवार अपघात प्रकरणात खळबळ!

## रोहित पवारांचा दावा: अपघाताच्या दिवशीच कोट्यवधींचे व्यवहार



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात गाजत असलेल्या अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात आता आर्थिक व्यवहारांबाबत नवे धक्कादायक दावे समोर आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणात मोठा आरोप करत अपघाताच्या दिवशीच संशयास्पद आर्थिक हालचाली झाल्याचे सांगितले आहे.**

### ● अपघाताच्या दिवशीच कोट्यवधींचा व्यवहार?

रोहित पवार यांच्या मते, अपघात घडलेल्या दिवशीच संबंधित कंपनीच्या मालकाच्या खात्यात सुमारे ९ कोटी रुपयांचा व्यवहार झाला. एवढेच नाही, तर दुसऱ्या दिवशी त्याहून मोठी रक्कम ट्रान्सफर झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या व्यवहारांमुळे या संपूर्ण प्रकरणावर संशयाची छाया अधिक गडद झाली आहे.

### ● व्ही. के. सिंग यांच्यावर संशय

या प्रकरणात VSR कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. रोहित पवार यांनी या आर्थिक व्यवहारांचा आणि अपघाताचा काही संबंध आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी याआधीही या कंपनीवर आणि संबंधित व्यक्तींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

### ● CID तपासावरही प्रश्न

रोहित पवार यांनी तपास यंत्रणांवरही नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, या प्रकरणात योग्य आणि पारदर्शक तपास होत नाही. ▶▶ उर्वरित पान २ वर







# तू गुलाल का उधळला ?

## संतोष देशमुखांच्या आईचा आशिर्वादासाठी आलेल्या विजयी उमेदवाराला बोचरा सवाल




**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या बीडच्या मस्साजोग ग्रामपंचायत निवडणुकीत धक्कादायक निकाल लागला आहे. हत्येन सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीत स्वरूपानंद देशमुख विजयी झाले असून त्यांनी दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी आश्विनी देशमुख यांचा पराभव केला आहे. यानंतर विजयी गुलाल उधळल्यानंतर स्वरूपानंद देशमुख हे संतोष देशमुख कुटुंबाच्या भेटीला गेले. त्यावेळी स्वरूपानंद देशमुख यांनी संतोष देशमुख यांच्या आईची भेट घेतली. यावेळी संतोष देशमुखांच्या आईने विजयी जल्लोषावर नाराजी व्यक्त केली. तुझी बहीण होती ना ती... दुसऱ्या कोणाचं असं झालं असतं तर गुलाल उधळला असता का? असा सवाल ▶▶ उर्वरित पान २ वर

## १ मे २०२६ महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा वर्धापन दिन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण



**बीड । प्रतिनिधी**

१ मे २०२६ महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा वर्धापन दिन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा येथील पोलीस कवायत मैदान येथे होणार आहे. मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा शुक्रवार दिनांक ०१ मे २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता होणार आहे. या सोहळ्याच्या आयोजनाबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज एक बैठकीत आढावा घेतला. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासनचे शैलेश सूर्यवंशी आदींची या बैठकीस प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम स्थळावरील व्यवस्था ▶▶ उर्वरित पान २ वर

## पूर्णवादी बँक प्रकरणात आरोपी देवळे'ला अटक



**जालना । प्रतिनिधी**

पूर्णवादी नागरि सहकारी बँकेच्याजालना शाखेतून तब्बल आठ कोटींपेक्षा जास्त रकमेचा अपहार केल्याप्रकरणी बँकेचा शाखाधिकारी शिरीष देवळे याला जालना पोलिसांनी जेरबंद केले आहे. पूर्णवादी बँकेच्या जालना शाखेचा शाखाधिकारी शिरीष देवळे याने पंचमुखी वेअर हाऊसचे मालक यांच्याशी संगणमत करून आठ कोटी बारा लाख ९२ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून देवळे विरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. जालना पोलीस अधीक्षक अजय बन्सल यांनी या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे दिला होता. सदर आरोपी देवळे हा जालन्यातच असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला अंबड चौफुली येथून अटक केली.

## बार्शी रोडच्या रेल्वे पूलाजवळ पथदिवे, सूचना फलक नसल्याने अपघात वाढले

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी रोडवरील रेल्वे पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या मार्गावर मोठ्या प्रमाणात आवक-जावक होत असताना, पुलाखाली व परिसरात एकही पथदिवा नसल्यामुळे अंधाराचे साम्राज्य पसरलेले दिसून येते. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाजवळ कोणतेही सूचना फलक नसल्यामुळे वाहनचालकांना पुढील धोका लक्षात येत नाही. तसेच रेडियम (रिफ्लेक्टर) नसल्याने रात्री वाहनांच्या प्रकाशात रस्त्याची किंवा पुलाच्या कडांची स्पष्ट जाणीव होत नाही, ज्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी येथे एक अपघात घडला होता. सुदैवाने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखाद्याचा बळी गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा ▶▶ उर्वरित पान २ वर

## साई मोबाईल शॉपी फोडणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद

### बीड स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कारवाई




**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सुभाष रोडवरील साई मोबाईल शॉपी फोडून मोबाईल चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने अटक करत मोठी कामगिरी बजावली आहे. या आरोपीकडून पुणे ग्रामीण व आहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गुन्ह्यांचाही उलगडा झाला आहे.

दि. १९ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ३.०० ते ३.५० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने साई मोबाईल शॉपीचे सेंटर लॉक व शटरचे कोंडे तोडून दुकानात प्रवेश केला होता. त्याने विविध कंपन्यांचे मोबाईल फोन चोरून नेले होते. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ए), ३३१ (४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू करत घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढला. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून हा गुन्हा कल्याण येथील सराईत ▶▶ उर्वरित पान २ वर

## फार्मर आयडी नोंदणीचे आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आलेला आहे. राज्यामध्ये एकूण १.७१ कोटी खातेदार संख्या असून यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलेले आहेत. ज्या शेतकरी बांधव-भगिनींनी अद्याप आपला फार्मर आयडी काढलेला नाही, त्यांनी तात्काळ नोंदणी करून घ्यावी. नोंदणी करण्यासाठी शेतकरी आपल्या नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर भेट देऊ शकतात किंवा स्वतःही ग्रीस्टॅक पोर्टलवरून ऑनलाइन नोंदणी करू शकतात. यापुढे कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच विविध कृषी निविष्ठा (बियाणे, खते, औषधे इ.) प्राप्त करण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक राहणार आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधव-भगिनींना आवाहन करण्यात येते की, ज्यांनी अद्याप फार्मर आयडी नोंदणी केलेली नाही त्यांनी विलंब न करता २० मे २०२६ पूर्वी आपला फार्मर आयडी काढून घ्यावा.फार्मर आयडी नोंदणी संदर्भात कोणतीही अडचण आल्यास खालील हेल्पडेस्कशी संपर्क साधावा. अ.क्र. विभाग सहाय्यक कृषी अधिकारी मोबाईल नंबर- १ अमरावती श्री. अजितकुमार गेजगे ९६५७१०९८०९
२ पुणे श्रीम. संगीता ननावरे ७५८८५०९४९२
३ कोकण श्रीम. सोनाली वाडेकर ९४०४९५३५१८
४ छ. संभाजीनगर श्रीम. शीतल कौदरे ९१७२३१९६३७
५ नागपूर श्री. अजितकुमार गेजगे ९६५७१०९८०९

# पोटनिवडणुकीत वहिनी का हरल्या ?

## धनंजय देशमुख यांनी सांगितलं राज'कारण



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावच्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला गावकऱ्यांनी साथ दिली नाही. परिणामी आज दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी संतोष देशमुख यांचा सरपंच पदाच्या निवडणुकीत पराभव झाला. स्वरुपानंद देशमुखयांनी या निवडणुकीत बाजी मारली. खरंतर जे गाव संतोष देशमुख कुटुंबाच्या पाठिशी उभं राहिलं, ते मतपेटीतून सोबत का नव्हते? हा प्रश्न निर्माण झाला आहे. वहिनीच्या पराभवाला काय कारणं ठरली त्यावर धनंजय देशमुख बोलले आहेत. पराभवाची अनेक कारणं आहेत. आमचा भाऊ गेल्यानंतर गावातील अनेकांना वाटायचं मला हे काम मिळावं. पण माझ्या हातात काही नव्हतं. न्यायाच्या लढाईत आम्ही असल्याने गावाशी असलेली नाळ तुटत गेली. भाऊ गेल्यानंतर मला ती टिकवून ठेवता आली नाही. मी पैसे वाटप केल्याचा आरोप कोणावरही केला नाही. त्यांनी जो राजकारण केल्याचा आरोप केला ते त्यांचं मत होतं असं धनंजय देशमुख म्हणाले. दरम्यान या निवडणुकीत विजयी ठरलेले नवे सरपंच स्वरूपानंद देशमुख निकाल जाहिर झाल्यानंतर स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी दाखल झाले आहेत. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यावर सूर्याने जणू आग ओकण्यास केली सुरवात

**बीड । प्रतिनिधी**

मागच्या पंधरा दिवसांपासून सूर्याने जणू बीड जिल्ह्यावर आग ओकण्यास सुरवात केली आहे. मंगळवारी तापमानाचा पारा ४४ अंशांकडे गेल्याची नोंद झाली. या वाढत्या तापमानामुळे बीडची बाजारपेठ थंडावली असून रस्ते भरदुपारी निर्मनुष्य होताना दिसत आहेत. जिल्ह्यात उन्हाचा तडाखा इतका प्रचंड आहे की, सकाळी १० पासूनच चटके जाणवू लागतात. दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे जिकिरीचे झाले आहे. बीडमधील सर्वाधिक वर्दळीचा समजला जाणारा धुळे-सोलापूर महामार्ग दुपारच्या सत्रात पूर्णपणे ओस ▶▶ उर्वरित पान २ वर



# 'सुपर एल निनो': 2026 चा उन्हाळा आणि उष्माघाताचे संकट – वेळीच व्हा सावध!

निसर्गाचे चक्र बदलत असून यंदा उन्हाळ्याने रौद्र रूप धारण करण्यास सुरुवात केली आहे. राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा चाळीशी पार गेला असून, सूर्याच्या प्रखर किरणांमुळे नागरिक होरपळून निघत आहेत. हवामान तज्ज्ञांच्या मते, २०२६ हे वर्ष भारताच्या हवामान इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. या भीषण परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने 'हीट वेव्ह'चा (उष्णतेची लाट) इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक हवामान बदलामध्ये 'सुपर एल निनो' ही घटना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. समुद्र सपाटीचे तापमान वाढल्यामुळे जगभरातील हवामानावर याचे विपरीत परिणाम होतात. यामुळे भारतात मान्सूनवर परिणाम होण्याची आणि उन्हाळ्याची तीव्रता कमालीची वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अनेक राज्यांत तापमान ४५ओसेल्सीअस वर जाण्याचे संकेत आहेत. भारतीय हवामान विभागाच्या (खचऊ) मानकानुसार किनारी प्रदेशासाठी: सलग दोन दिवस कमाल तापमान ३७ओसेल्सीअस पेक्षा जास्त राहिल्यास.



जेव्हा तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा ४.५ओसेल्सीअस ते ६.४ओसेल्सीअस ने वाढते, तेव्हा त्याला 'उष्णतेची लाट' म्हणतात. : जेव्हा तापमान सरासरीपेक्षा ६.५ओसेल्सीअस पेक्षा जास्त वाढते, तेव्हा अतिउष्ण लाट ही स्थिती जीवघेणी ठरू शकते.

उष्माघाताची लक्षणे: वेळीच ओळखा धोका

उष्माघात ही केवळ थकव्याची अवस्था नसून ती एक वैद्यकीय आणीबाणी आहे. खालील लक्षणे दिसताच सावध व्हावे:

१. शरीराचे तापमान कमालीचे वाढणे पण घाम न येणे.

२. चक्कर येणे, डोकेदुखी किंवा मळमळणे.

३. त्वचा कोरडी आणि लाल होणे.

४. तीव्र तहान लागणे आणि लघवीचे प्रमाण कमी होणे.

५. लहान मुलांमध्ये प्रचंड चिडचिड आणि सुस्ती येणे.

उष्णतेपासून बचावासाठी 'हे' करा (मार्गदर्शक सूचना)

जलसंजीवन मंत्र

तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३–४ लिटर पाणी प्या.

निसर्गदत्त पेयांचा वापर करा: लिंबू सरबत, ताक, शहाळ्याचे पाणी, आमसूल सरबत आणि घरगुती पन्हे शरीरातील ओलावा टिकवून ठेवतात.

पोशाख आणि घराबाहेर पडताना काळजी

बाहेर पडताना नेहमी सुती, हलके आणि पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे कपडे घाला.

डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगल्स वापरा.

शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर पडणे टाळा.

आहारातील बदल

प्रथिनयुक्त (High Protein) आहार आणि मांसाहार उन्हाळ्यात कमी करावा, कारण तो पचायला जड असतो.

बाहेरील उघड्यावरचे पदार्थ किंवा शिळे अन्न खाणे टाळा.

अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड कोल्ड ड्रिंक्स टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी कमी होते.

घराचे व्यवस्थापन

दुपारच्या वेळी खिडक्यांना पडदे लावून ठेवा. रात्री हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा.

घरातील वृद्धांची आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्या.

सामाजिक जबाबदारी

आपण आपल्यासोबतच मुक्या प्राण्यांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. घराबाहेर किंवा बाल्कनीत पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत बांधा आणि त्यांना पुरेसे पाणी द्या.

लक्षात ठेवा: उन्हाळ्याची ही तीव्रता केवळ निसर्गाचा कोप नसून वाढते औद्योगिकीकरण आणि जंगलतोडीचा परिणाम आहे. स्वतःचे रक्षण करण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे, हेच उन्हाळ्यावरील कायमस्वरूपी उत्तर आहे.

आपत्कालीन संपर्क: तब्येत बिघडल्यास वेळ न घालवता जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधा किंवा १०८ या हेल्पलाईनवर रुग्णवाहिकेसाठी कॉल करा.

सावध राहा, सुरक्षित राहा आणि उन्हाळ्याचा सामना धैर्याने करा!

**– प्रविण डोंगरदिवे, उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग**

◆ पान 9 वरून पुढे...

## अजित पवार अपघात....

काही आरोपींना विशेष वागणूक दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास स्वतंत्र आणि निष्पक्ष यंत्रणेकडून व्हावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आधीपासूनच संशयाची मालिका– अजित पवार यांच्या अपघाताबाबत सुरुवातीपासूनच अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. विमानातील तांत्रिक बिघाड, पायलट बदल, तसेच फ्लाइटच्या नियोजनाबाबतही रोहित पवार यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले होते. या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले आहेत.

मोठ्या प्रकल्पांशी संबंध ?रोहित पवार यांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित करत सांगितले की, संबंधित कंपनी मोठ्या प्रकल्पांमध्ये मध्यस्थ म्हणून काम करत असल्याचा संशय आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार आणि अपघात यांच्यात काही संबंध आहे का, याचा तपास करणे अत्यंत गरजेचे आहे.

चौकशीची मागणी तीव्र– या सर्व आरोपांमुळे प्रकरणाची गंभीरता वाढली असून आता निष्पक्ष चौकशीची मागणी अधिक जोर धरत आहे. रोहित पवार यांनी सीआयडीकडे अतिरिक्त पुरावे सादर केल्याचेही सांगितले जाते. पुढील घडामोडींवर लक्ष– या प्रकरणात सतत नवीन दावे आणि आरोप समोर येत असल्याने राज्यातील राजकारण तापले आहे. आर्थिक व्यवहार, विमान कंपनी आणि अपघात यातील संबंध स्पष्ट होण्यासाठी तपासाच्या निष्कर्षाची सर्वजण प्रतीक्षा करत आहेत.

## संतोष देशमुखांच्या....

संतोष देशमुखांच्या आईने केला आहे. बीडच्या मस्साजोग ग्रामपंचायतीमध्ये विजयी झाल्यानंतर स्वरूपानंद देशमुख हे धनंजय देशमुख कुटुंबाच्या भेटीला गेले. संतोष देशमुखांच्या आईची भेट घेतली तसेच संतोष देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार केला अर्पण केला.. यावेळी धनंजय देशमुख उपस्थित होते. यावेळी चांगले काम करा आम्ही सोबत राहू.. संतोष आण्णाच आम्ही स्वप्न पूर्ण करू.. असा संवाद धनंजय देशमुख आणि स्वरूपानंद देशमुख यांच्यामध्ये झाला. स्वरूपानंद देशमुख यांनी संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनीताई देशमुख यांचा पराभव केला. यानंतर स्वरूपानंद देशमुख यांच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत वाजत गाजत गावात मिरवणूक देखील काढली. या मिरवणुकीनंतर दरम्यान स्वरूपानंद देशमुख यांच्या घरी भेट देण्यासाठी देखील गेले. यावेळी त्या ठिकाणी संतोष देशमुख यांच्या आई उपस्थित होत्या.. त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी पोहोचलेल्या स्वरूपानंद देशमुख यांना दुसऱ्या कोणाचे असे झाले असते तर गुलाल उधळला असता का? असा सवाल संतोष देशमुख यांच्या आईने केला.

स्वरूपानंद देशमुख यांचा काढता पाय– स्वरूपानंद यांनी काही विलाज नव्हता माझा असे म्हटले. यावर संतोष देशमुख यांच्या आईने विलाज कसा नव्हता? तुझी बहीण होती ना ती... असा प्रश्न करत आपली नाराजी व्यक्त केली. यानंतर स्वरूपानंद देशमुख यांनी त्या ठिकाणाहून काढता पाय घेतला. तर जवळच असलेल्या संतोष देशमुख यांच्या प्रतिमेला देखील स्वरूपानंद देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. यावेळी धनंजय देशमुख हे देखील उपस्थित होते. धनंजय देशमुख यांनी स्वरूपानंद देशमुख यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तर स्वरूपानंद देशमुख यांनी न्यायाच्या लढाईत देशमुख कुटुंबासोबत राहुल संतोष देशमुख यांचे स्वप्न पूर्ण करणार असल्याची ग्वाही दिली.

## १ मे २०२६ महाराष्ट्र ....

त्याचप्रमाणे इतर आयोजन याबाबत यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. मुख्य ध्वजारोहण सकाळी ८.०० वाजता असल्याने इतर कार्यालयाने सकाळी ७.१५ वाजेपूर्वी ध्वजारोहण करणे किंवा मुख्य ध्वजारोहणानंतर ९.०० वाजेनंतर ध्वजारोहण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. मुख्य प्रशासकीय इमारत– मुख्य प्रशासकीय इमारत येथील ध्वजारोहण सकाळी ६.४५ वाजता अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय– जिल्हाधिकारी कार्यालय ध्वजारोहण सकाळी ७.१० वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते होईल.

## बार्शी रोडच्या ...

संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन पुलावर पथदिवे बसवणे, सूचना फलक लावणे तसेच रेडियम पट्टे बसवून सुरक्षेच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## साई मोबाईल...

गुन्हेगार रामनिवास मंजू गुप्ता (वय ३७) याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलीस तपासात आरोपीविरुद्ध महाराष्ट्र व गुजरात राज्यात ५० हून अधिक मालमत्तेविरुद्धचे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले. त्यानुसार पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार विशेष पथक गठीत करण्यात आले. या पथकाने ठाणे, मुंबई, गोवा व गुजरात येथे शोधमोहीम राबवत अखेर दिवा (ठाणे) येथे सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली देत चोरीचे मोबाईल एका तिसऱ्या व्यक्तीकडे दिल्याचे सांगितले. पुढील तपासात आरोपीने आहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील जिओमार्ट डिजिटल व मधु वाईन, तसेच पुणे ग्रामीण जिल्ह्यातील शिरूर येथील एस.एस. मोबाईल शॉपी फोडल्याचेही समोर आले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास बीड शहर पोलीस करत असून आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/सोमनाथ गायकवाड, मारूती कांबळे, अर्जुन यादव, बाळु सानप, पोअ/मनोज परजणे, अशफाक सय्यद, विकी सुरवसे, तसेच चापोह अतुळ हराळे व सिद्धेश्वर मांजरे यांनी पार पाडली.

## पोटनिवडणुकीत वहिनी....

अश्विनी देशमुख यांचा पराभव झाल्यानंतर त्यांची भेट घेण्यासाठी ते पोहोचले आहेत. संतोष देशमुख यांच्या न्यायाच्या लढ्यात आपण यापुढे देखील सोबत राहणार असल्याची प्रतिक्रिया स्वरूपानंद यांनी दिली होती. स्वरुपानंद देशमुख यांनी संतोष देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी धनंजय देशमुख उपस्थित होते. त्यांनी स्वरूपानंद देशमुख यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. राजकारणात काहीही घडू शकतं. जे वरुन दिसतं तसं नसतं. आतली परिस्थिती वेगळी असते. हेच आजच्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावच्या सरपंचपदाच्या निवडणूक निकालातून दिसून आलं. दीड वर्षांपूर्वी ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृण हत्या झाली होती. मारेकऱ्यांची क्रूरतेचं टोक गाठलं होतं. यांना माणसं म्हणावं का? असा प्रश्न सर्वांना पडलेला. या प्रकरणात वाल्मिक कराड आणि काही जण आजही तुरुंगात आहेत. न्यायालयात या प्रकरणी खटला सुरु आहे. गुन्ह्याची क्रूरता पाहता संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी बीडसह संपूर्ण राज्यभरात मोर्चे निघाले होते. त्यातून बीडच्या राजकारणातील अनेक गोष्टी बाहेर आल्या. अख्खच्या अख्ख मस्साजोग गाव संतोष देशमुखांना न्याय मिळाला पाहिजे म्हणून आंदोलनाला बसायचं. गावकऱ्यांनी भक्कपणे संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला साथ दिली.

## बीड जिल्ह्यावर....

पडत आहे. एखाद दुसरे वाहन किंवा लांब पल्ल्याची बस सोडली, तर महामार्गावर शुकशुकाट जाणवतो. नागरिक आपली सर्व महत्त्वाची कामे सकाळीच उरकून घेत आहेत. शेतकरीही मळणी आणि मशागतीची कामे सकाळी किंवा सायंकाळच्या सत्रातच करत आहेत. मात्र, या भीषण उन्हातही पोटाची खळगी भरण्यासाठी वीटभट्टी आणि बांधकाम कामगारांना डोक्यावर ऊन घेऊन काम करावे लागत आहे. उन्हापासून वाचण्यासाठी बीडकरांनी आता नवनवीन आणि हटके उपाय शोधले आहेत. शहरात सध्या एका हेड–माउंटेड छत्रीची मोठी चर्चा आहे. दुचाकी चालवताना किंवा हातात पिशव्या असताना साधी छत्री पकडणे कठीण होते. त्यावर उपाय म्हणून एका सजग नागरिकाने थेट डोक्यावर टोपीसारखी फिट बसणारी छत्री वापरण्यास सुरवात केली आहे. यामुळे दोन्ही हात मोकळे राहून उन्हापासून पूर्ण संरक्षण मिळते. ही हटके छत्री सध्या बीडकरांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे उष्माघाताची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा रुग्णालयासह अंबाजोगाईचे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, परळी, गेवराई, केज, माजलगाव, लोखंडी, रायमोह, आष्टी, पाटोदा, नेकनूर, तालखेड, तेलगाव, चिंचवण आणि धारूर या सर्व उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांत स्वतंत्र उष्माघात कक्ष उभारण्यात आले आहेत. सुदैवाने अद्याप जिल्ह्यात उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही. आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना भरपूर पाणी पिण्याचे आणि दुपारी १२ ते ३ या वेळेत कष्टाची कामे टाळण्याचे आवाहन केले आहे. उन्हापासून संरक्षणासाठी तहान नसली तरी दर अर्ध्या तासाने पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी ओआरएस, लस्सी, लिंबू–पाणी, ताक आणि कैरीचे पन्हे यांसारख्या पारंपरिक पेयांचा जास्तीत जास्त वापर करावा. पाळीव प्राण्यांना आणि गुरांनाही सुरक्षित सावलीत बांधून त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, जर तुम्हाला अचानक चक्कर येणे, सतत घाम येणे, तीव्र डोकेदुखी किंवा टोकाचा अशक्तपणा जाणवू लागला, तर ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशा वेळी घरगुती उपाय करण्याऐवजी तत्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात संपर्क साधावा. उन्हात बाहेर पडताना पांढऱ्या किंवा हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## एक मे कामगार...

आहे. काम करूनही हातात काहीच येत नाही, अशा परिस्थितीत जगायचे कसे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.या पार्श्वभूमीवर, येत्या १ मे रोजी कामगार दिनाच्या दिवशीच पाटोदा नगरपंचायतीसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. कामगार दिनासारख्या महत्त्वाच्या दिवशीही आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागत असल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन प्रलंबित वेतन अदा करावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा किरण जावळे यांनी दिला आहे.

## दोन महिन्यानंतरही...

पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत गोसावी व चौसाळा पोलीस चौकीचे पोलीस कर्मचारी सचिन मुरूमकर यांनी आरोपीच्या नातेवाईकांकडून पैसे घेऊन आरोपीला अभय देत आहेत. त्यामुळे वरील दोघांनाही निलंबित करावे आणि माझी मुलगी मला परत मिळवून द्यावी. अन्यथा १ मे महाराष्ट्र दिन या दिवशी पालकमंत्री बीड यांच्या गाडीवर सडलेले टमाटे फेकण्याचा इशारा मुलीच्या पालकांनी लेखी निवेदनात दिला आहे.

## आष्टी तालुक्यातील...

नेतृत्वावर मतदारांचा विश्वास कायम असल्याचे अधोरेखित झाले आहे. या विजयानंतर आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन केले. मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस प्रतिष्ठान'च्या वतीने विजयी उमेदवारांचा सत्कार करण्यात आला.

## मुस्लिमांच्या विकास...

मंजूर पदे तत्काळ भरणे तसेच तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर कार्यालय सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. अल्पसंख्याक तरुणांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. कौशल्य विकास, तंत्रज्ञानाधारित शिक्षण आणि रोजगाराभिमुख उपक्रमांद्वारे युवकांना सक्षम करण्यावर राज्य सरकारचा विशेष भर राहील, असे देखील स्पष्ट करण्यात आले अल्पसंख्याक पायाभूत सुविधां व इतर सर्व योजनाचा फायदा सर्वसामान्य नागरिकाना मिळून द्यावा असे निवेदन मा.उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी दिले आहेत.....

## दिवसाढवळ्या बीड ...

आल्या होत्या. काम आटोपल्यानंतर त्या नगर नाका येथील बेंगलोर बेकरी समोर बसची वाट पाहत थांबल्या होत्या. दरम्यान, एक अनोळखी महिला त्यांच्याशी संवाद साधत जवळ आली आणि गळ्यातील सोन्याचे दागिने काढून पिशवीत ठेवा असा सल्ला दिला. तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवून देवईबाई यांनी गळ्यातील सोन्याची पोत काढून पिशवीत ठेवली. त्यानंतर बसमध्ये चढताना त्या महिलेनं मागून धक्का देत गोंधळ निर्माण केला. घरी परतल्यानंतर देवईबाईंना आपली पिशवी हरवल्याचे लक्षात आले. पिशवीत ठेवलेली सोन्याची पोत तसेच बँकेचे कागदपत्र चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी तातडीने बीडला येऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या प्रकरणी शिवाजी नगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून दागिने चोरणाऱ्या अज्ञात महिलेचा शोध पोलिसांनी सुरू केला. दागिने चोरीच्या घटना घडत असल्याने महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. महिलांनी नागरिकांनी अशा प्रकारच्या फसवणुकीपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बीड शहरात अवैध....

कारवाई होत नसल्याने लाखो रुपयांचा महसूल पाण्यात जात आहे. यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रार देऊन देखील कारवाई शून्य! रहिवाश्यात संताप : बीड नगरपालिका प्रशासन या अवैध बांधकामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई न झाल्याने असे प्रकार वाढत आहेत. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून संबंधित बांधकामे थांबवावी, व बाजूच्या इमारती खचून दुर्घटना झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही नगरपालिका प्रशासनाची असणार अश्या तीव्र प्रतिक्रिया सोमेश्वर नगरमधील नागरिकांनी व्यक्त केली. नागरीकांची मागणी : सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून अपुऱ्या जागेत सुरू असलेले अपार्टमेंट बांधकाम तात्काळ स्थगित करावे तसेच शहरातील सर्व अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. यावेळी या भागातील रहिवासी हनुमंत जगताप,डॉ.राजेंद्र बंड,नवनाथ अवघड प्रवीण सुरवसे, कैलास शेजाळ,विष्णू जगताप, किरण काळे,नवनाथ जगताप, मुद्राम ढवळे मनोज केदार, लक्ष्मण जाधव,ज्ञानेश्वर गरड,संजय काळे,मधुकर शेळके नितीन काकडे कदम,सतीश राऊत,तांबडे सूर्यभान यासह अनेक नागरिकांचे स्वाक्षऱ्या आहेत

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अहमदपूर–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर मोठमोठ्या भेगा

## कंत्राटदारांचा डांबराने ठिगळं लावण्याचा केविलवाणा प्रयत्न ! कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डीची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेल्या भेगा, तडे आणि खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. सुमारे १७० किलोमीटर लांबीच्या आणि ८७८ कोटी रुपये खर्चाच्या





या महामार्गावर मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान विशेषतः रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. दुचाकी वाहनांचे चाक खड्ड्यांमध्ये अडकून अपघात होत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या संदर्भात तक्रारी करूनही ठोस उपाययोजना न करता संबंधित कंत्राटदार एचसीपीएल कडून केवळ डांबर टाकून खड्डे बुजवण्याचा तात्पुरता केविलवाणा प्रयत्न केला जात आहे. ही मलमपट्टी तात्पुरती स्वरूपाची दुरुस्ती असल्याने समस्या कायमच राहार आहे. दरम्यान, मांजरसुंभा ते अंबेजोगाई दरम्यान एचपीएम कंपनीकडील कामही रखडलेल्या अवस्थेत आहे. दुभाजक, पथदिवे, दिशादर्शक फलक आणि रस्त्यालगतच्या नाल्यांचे काम अपूर्ण असल्याने स्थानिक नागरिक व दुकानदारांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वारंवार लेखी तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने ठेकेदारांचा बेजबाबदारपणा वाढल्याचा आरोप होत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्त्यांची सिमेंट ब्लॉक कट पद्धतीने कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती करावी, तसेच अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

## पारगाव (जप्ती) येथे लक्ष्मण शक्तीचा भव्य मुक्ती सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पारगाव (जप्ती) येथे लक्ष्मण शक्तीचा भव्य मुक्ती सोहळ्याचे शनिवार दि.२ मे २०२६ रोजी आयोजन करण्यात आले असून पारगाव (जप्ती) पंचक्रोषितील भाविक-भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी सैनिक, ऑर्नरी लेफ्टनंट त्रिंबक मारोती तिपाले यांनी केले आहे.

मौजे पारगाव जप्ती येथे गत दोन वर्षापासून लक्ष्मण शक्तीचा भव्य मुक्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या वर्षी देखील हा सोहळा होणार असून शनिवार, दि.०२/०५/२०२६ रोजी सायं.६.०० वाजता ग्रंथ वाचनास सुरुवात होणार आहे. तसेच रविवार दि.०३/०५/२०२६ रोजी सकाळी ६ वाजता महाआरती संपन्न होणार आहे. त्यानंतर भाविक-भक्तांना महाप्रसादाची पंगत होईल. या लक्ष्मण शक्तीच्या ग्रंथाचे वाचन लक्ष्मण दादाराव तिपाले, राम बाबुराव तिपाले, सत्यवान गोपीनाथ तिपाले हे करणार आहेत. तर दिलीप शिवदास तिपाले, राजेंद्र देविदास तिपाले, सतीष राम तिपाले हे सुचक असणार आहेत. तरी पंचक्रोषितील सर्व श्रीराम भक्त, वाचक, सूचक व श्रोते मंडळी यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन ऑर्नरी लेफ्टनंट त्रिंबक मारोती तिपाले यांच्यासह पारगाव जप्ती ग्रामस्थांनी केले आहे.

## कृष्णा थापडे व मोहन थापडे यांना मारहाण करून शिवीगाळ केल्याच्या आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता :ॲड. युवराज शेळके

**बीड । प्रतिनिधी**

कृष्णा थापडे व मोहन थापडे यांना मारहाण करून शिवीगाळ केल्याच्या आरोपातून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणातून आरोपींची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

सविस्तर असे की,कृष्णा थापडे याने दिनांक १९/०४/२०१४ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४४/२०१४ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ व ३४ भा. द. वी.नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता की, दिनांक १८/०४/२०१४ रोजी सकाळी



आठ वाजण्याच्या सुमारास त्याचे वडील नामे मोहन अंबादास थापडे यांनी त्यांचे ढेकणमोहा शिवरातील भगीरथ मळा येथील शेतात शेळ्या का चारल्या? असा जाब विचारल्यावरून आरोपी नामे भगवान थापडे,आशाबाई भगवान थापडे,संतराम भगवान थापडे, राहुल भगवान थापडे यांनी मोहन थापडे यांना कुऱ्हाड,लोखंडी गज,काठी, कासरा यांनी मारहाण करत असताना कृष्णा थापडे याने मध्यस्थी केली असता,वरील आरोपींनी कृष्णा थापडे याला लोखंडी गजाने व काठीने पाठीवर, पायावर, मांडीवर व ओठावर मारहाण करून जखमी व रक्तबंबाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. त्या अनुषंगाने तपासी अंमलदार पिंपळनेर पोलीस स्टेशन यांनी दहा साक्षीदारांचे जबाब नोंदवून न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीच्या विरुद्ध नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक ४१२/२०१५ नुसार खटला चालवण्यात आला. या खटल्यामध्ये साक्षीपुरावा होऊन प्रथम दर्शनी साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला.परंतु आरोपींच्या वतीने घेण्यात आलेला बचाव व युक्तिवाद ग्राह्य धरून मा. दुसरे अतिरिक्त न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांनी चारही आरोपींची सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड तालुक्यातील ढेकणमोहा परिसरातील लोकांचे लक्ष लागून होते.आरोपींच्या वतीने ॲड. युवराज शेळके यांनी महत्त्वपूर्ण बाजू मांडली व त्यांना ॲड. श्रीराज शेळके यांनी सहकार्य केले.




*मौजे ईट ता बीड येथे बुधवार दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर कलशारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला, या प्रसंगी भाविक भक्तनी दर्शन घेतले.*

## 1 मेचा निकाल ठरणार खास; आता प्रगतीपुस्तकासोबत पाल्याच्या उत्तरपत्रिकाही पालकांना दाखवणे अनिवार्य

### शिक्षण विभागाचा नवा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा निकाल येत्या १ मे रोजी जाहीर होणार असून, यंदा शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हा निर्णय जाहीर करतांनाच एक क्रांतिकारी म्हटल्या जावू शकणारा निर्णय पण शिक्षण संचालनालयाने घेतला आहे. या दिवशी विद्यार्थी व पालक यांना प्रगतीपुस्तक देण्यात येते. त्यावरून पालकांस आपल्या पाल्याची गुणवत्ता निदर्शसनास



येते. वर्षभर आपला मुलगा शाळेत जे काही शिकला, त्याचे मोघम मूल्यमापन होते. शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल १ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २ मे २०२६ पासून राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या शाळांना अधिकृतपणे उन्हाळी सुट्टी सुरू होईल. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये सुसंगती आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याच दिवशी एक महत्वाची घडामोड पण घडणार. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षक व पालकांचे संयुक्त कर्तव्य आहे. त्यादृष्टीने एक पाऊल टाकण्यात आले आहे. निकाल देतांना आता केवळ प्रगतीपुस्तक नं देता विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका पालकांना दाखविणे अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षण आयुक्तानी असे आदेश दिले आहेत.पालकांच्या निदर्शनास आणल्यामुळे पालकांना आपल्या पाल्याची संकल्पनात्मक समज, उत्तर लिहिण्याचे कौशल्य आणि नेमक्या चुका कोठे होत आहेत, याचे अचूक निदान करता येईल. केवळ गुणांवर लक्ष केंद्रित न करता, मुलांच्या कौशल्यांवर आधारित प्रगती मोजणे यामुळे शक्य होणार आहे.शिक्षण संचालनालयाने या निर्णयाचे विविध फायदे स्पष्ट केले आहेत. विद्यार्थ्यांच्या कच्च्या दुव्यांवर पालकांच्या मदतीने घरच्या घरी उपाययोजना करणे सोपे होईल. पाल्याच्या अभ्यासाच्या सवयी, वाचन आणि लेखनाबाबत पालक अधिक सजग व जबाबदार होतील. मूल्यमापन प्रक्रियेबाबत पालकांचा विश्वास वाढेल आणि विद्यार्थ्याच्या प्रगतीचे वस्तुनिष्ठ चित्र समोर येईल.

## डोंबिवलीत पोलीस दलावर शोककळा: खाकी मिळवली, मृत्यूला कवटाळलं; 'त्या' एका घटनेनं सर्वच सुन्न

**मुंबई । प्रतिनिधी**



डोंबिवलीमध्ये घडलेल्या एका धक्कादायक घटनेने पोलीस विभागासह संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. विष्णूनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार राम मिसाळ यांनी त्यांच्या राहत्या घरी आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना उघडकीस येताच पोलीस दलात दुःखाचे वातावरण पसरले असून सहकाऱ्यांसह स्थानिक नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही संपूर्ण घटना त्यांच्या घरातच घडली. घरातील सदस्यांना प्रकार लक्षात येताच त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा आणि अन्य आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. ही घटना समोर आल्यानंतर परिसरात मोठी चर्चा सुरू झाली. राम मिसाळ यांच्या घराबाहेर नागरिकांची आणि ओळखीच्या लोकांची गर्दी पाहायला मिळाली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे अनेकांना धक्का बसला आहे. विशेष म्हणजे मिसाळ हे शांत, संयमी आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे त्यांच्या अशा अचानक जाण्यामुळे सहकारीही हादरले आहेत. सध्या आत्महत्येमागील नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी या प्रकरणाचा गंभीरपणे तपास सुरू केला असून विविध अंगांनी चौकशी केली जात आहे. कुटुंबीयांची परिस्थिती, मानसिक ताण, कामाचा दबाव किंवा अन्य कोणते कारण या घटनेमागे आहे का याचा शोध घेतला जात आहे.

राम मिसाळ यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या भावना मन हेलावून टाकणाऱ्या आहेत. ते अत्यंत प्रामाणिक आणि शांत स्वभावाचे होते.

## दानवेंच्या उमेदवारीने राजकारणात खळबळ आता राऊतांनी ट्वीट करून निकाल लावून टाकला



**मुंबई । प्रतिनिधी**

विधानपरिषदेच्या निवडणुकीमुळे सध्या राज्यात राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. भाजपाने नुकतेच आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. भाजपाने यावेळी नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाचे काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पक्षाने विधानपरिषदेच्या निवडणुकीचे तिकीट दिले आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीकडून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा, यासाठी प्रयत्न केला जात होता. शरद पवार यांच्या पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे पाटील, काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्यक्ष ठाकरे यांनीच उमेदवार राहावे यासाठी प्रयत्न केले होते. परंतु आता ठाकरे गटाने ऐनवेळी विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेत अंबादास दावने यांना तिकीट दिले आहे. त्यानंतर आता खासदार संजय राऊत यांनी एक ट्वीट केले आहे.

संजय राऊत यांच्या ट्वीटमध्ये नेमके काय आहे?

ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आमच्या पक्षाकडून तसेच महाविकास आघाडीचे विधानपरिषदेच्या निवडणुकीचे उमेदवार अंबादस दानवे हेच असतील, असे जाहीर केले. त्यानंतर लगेच संजय राऊत यांनी आपल्या सोशल मीडियावर एक ट्वीट केले आहे. या ट्वीटमध्ये त्यांनी अंबादास दानवे यांच्या उमेदवारीविषयी भाष्य केले. 'अंबादास दानवे हे शिवसेनेचे म्हणजेच महाविकास आघाडीचे विधान परिषदेचे उमेदवार असतील. उद्या ११ वाजता ते उमेदवारी अर्ज दाखल करतील. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दानवे यांच्या नावाची घोषणा केली आहे,' असे संजय राऊत आपल्या ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.

दरम्यान, अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा होताच काँग्रेसने आपली वेगळी चूल मांडण्याची भूमिका घेतली आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेने अंबादास दानवे यांना तिकीट दिले असले तर आम्ही काँग्रेसकडून आमचा उमेदवार देणार आहोत. पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून आम्ही त्याबाबत निर्णय घेऊ, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे.

दरम्यान, अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा होताच काँग्रेसने आपली वेगळी चूल मांडण्याची भूमिका घेतली आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेने अंबादास दानवे यांना तिकीट दिले असले तर आम्ही काँग्रेसकडून आमचा उमेदवार देणार आहोत. पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून आम्ही त्याबाबत निर्णय घेऊ, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. त्यामुळे आता नेमकं काय होणार? महाविकास आघाडीत काँग्रेसची मनधरणी कशी केली जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## साखरपुडा झाला, मंडप सजला, पण एका झटक्यात तरुणींच्या स्वप्नांचा चुराडा झाला

**अमरावती । प्रतिनिधी**

लग्नाची पत्रिका देवा चरणी अर्पण करून सुखी संसाराचे स्वप्न पाहणाऱ्या एका तरुण वधूवर काळाने झडप घातली आहे. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील बांबरुड महादेवाचे गावाजवळ कारचा टायर फुटून भीषण अपघात झाला.

या अपघातात नवरीसह तिच्या वहिनीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे अमरावती जिल्ह्यातील परतवाडा परिसरात शोककळा पसरली आहे. काही दिवसांवर या तरुणीचे लग्न होणार होते. तिचा साखरपुडा ही झाला होता. ती आपल्या संसाराची स्वप्न पाहात होती त्याच वेळी ही दुर्दैवी घटना घडली.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील शिखा बेलसरे या तरुणीचा २१ एप्रिल रोजी साखरपुडा झाला होता. ८ मे रोजी तिचा विवाह संपन्न होणार होता. घरात सर्व तयारी झाली होती. मंडप ही घातला होता. लग्नाची पहिली पत्रिका अर्पण करण्यासाठी बेलसरे कुटुंब नाशिकच्या सप्तशृंगी गडावर गेले होते. देवदर्शन आटोपून परतत असताना पाचोरा-भडगाव रस्त्यावरील बांबरुड गावाजवळ




त्यांच्या कारचे टायर अचानक फुटले. नियंत्रण सुटल्याने कारचा भीषण अपघात झाला.

या अपघातात वधू शिखा बेलसरे आणि तिची वहिनी मीना मानकर यांचा दुर्दैवी अंत झाला. तसेच शुभम बेलसरे आणि सुनील मानकर हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लग्नाचा मांडव सजलेला असतानाच या दोन मृत्यूंनी सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शिखा लग्न होणार म्हणून खुश होती. पण तिच्या मृत्यून लग्न घरात आता शोक व्यक्त केला जात आहे. ज्या घरातून तिची पाठवणी होणार होती त्या ऐवजी आता तिच्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आली आहे. या अपघाताने शिखाच्या घरचे हादरून गेले आहेत. तर तिच्या होणाऱ्या सासरच्या लोकांनी मोठा धक्का बसला आहे. शिकाचा ८ मे रोजी विवाह होता, घरात लग्नाची धावपळ सुरू होती. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. जळगावच्या पाचोरा तालुक्यात झालेल्या एका भीषण अपघाताने एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आनंद क्षणात हिरावून घेतला आहे. टायर फुटल्याने झालेल्या या अपघातात नवरी मुलगी आणि तिच्या वहिनीचा मृत्यू झाला असून लग्नाच्या घरात आता अंत्यविधीची तयारी करण्याची वेळ आली आहे.

## मधुमित्र मधुसखी पुरस्कारासाठी ४ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने सन २०२६ साठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकने मागविण्यात आली आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी तसेच मधपाळांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. मधमाशीपालन क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत असलेल्या


## जाहीर प्रगटन

अर्जदार **प्रदिप हनुमंतराव पिंपळे रा. टाकळगाव ता.गेवराई जि. बीड** यांचा अर्ज दिनांक २९.०४.२०२६ उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र. ०२ नुसार अर्जदार प्रदिप हनुमंतराव पिंपळे रा. टाकळगाव ता.गेवराई जि. बीड यांनी अर्ज देऊन नमूद केले की, यांचे वडील नामे हनुमंतराव उद्धवराव पिंपळे यांचा मृत्य दिनांक ०९.१२.२०१० रोजी स्वामी विवेकानंद सरकारी दवाखाना अंबाजोगाई जिल्हा बीड येथे झाला असून संबंधिताची नोंद करावयाची राहून गेल्याने प्रकरणात मृत्यू नोंद आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्ज विनंती करण्यात आलेला आहे. करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक मृत्यू नोंद २५२६/ईआं/११९/१९/प्र.क्र.३२/कृ.क नवीन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदारास स्थानिक मृत्यू नोंदणी पुरावा व रहिवासी तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी टाकळगाव यांनी अर्जदाराचे स्थानिक रहिवासीबाबत स्थानिक चौकशी/पंचनामा करून वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

उत्तर: अर्जदार प्रदिप हनुमंतराव पिंपळे रा. टाकळगाव ता.गेवराई जि. बीड यांना प्रत देऊन कळविण्यात येते की, आपल्या वडिलांचे मृत्यू बाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये स्वतःच्या खर्चाने जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणे व वृत्तपत्राची मूळ प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच आपण अर्जासह स्वयंघोषणापत्र सादर करताना ०२ स्थानिक प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी, तंटामुक्ती अध्यक्ष, राजपत्रित अधिकारी यांची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घेण्यात यावी.

शिक्का

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

दैनिक
मराठवाडा पत्र
▸▸ गुरूवार दि. ३० एप्रिल २०२६ ▸▸ Page 4

## एक मे कामगार दिना दिवशी वेतनासाठी कामगाराचा पाटोदा नगरपंचायत समोर आंदोलनाचा इशारा



**पाटोदा । प्रतिनिधी–** पाटोदा नगरपंचायत स्थापन झाल्यापासून आजपर्यंत वेतन न मिळाल्याने संतप्त झालेल्या कामगाराने अखेर आंदोलनाचा इशारा किरण नवनाथ जावळे यांनी दिला आहे प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांच्या वेतनाचा प्रश्न प्रलंबितच राहिल्याचा आरोप केला आहे.किरण जावळे यांच्या मते, अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे त्यांना तसेच त्यांच्या कुटुंबाला आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत ▶▶ उर्वरित पान २ वर

# परळी तालुक्यातील तीनही ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत आ. धनंजय मुंडेंचे एकहाती वर्चस्व!

**● सिरसाळा पुन्हा ताब्यात, तर जळगव्हाण आणि मरळवाडी सहज राखली; ● सर्व नवनिर्वाचित सरपंच जगमित्र कार्यालयात दाखल**

**परळी वै. । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले असून परळी तालुक्यातील तीनही ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या उमेदवारांनी एकहाती विजय मिळवत तीनही ग्रामपंचायती वरती धनंजय मुंडे यांचे एकेरी वर्चस्व सिद्ध केले आहे. या पोटनिवडणुकीत परळी तालुक्यातील सिरसाळा या मोठ्या व मानाच्या समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत शेख नसीब यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला असून विजयानंतर त्यांनी सहकाऱ्यांच्या समवेत आ. धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयात जाऊन स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जल्लोष



केला. यावेळी सिरसाळा ग्रामपंचायत नवनिर्वाचित सरपंच शेख नसीब शेख रहीम, माजी सरपंच फिरोज पठाण, ग्रामपंचायत सदस्य शेख नय्युम, शेख रफिक, अक्रम पठाण, सलमान पठाण, माजी सरपंच इम्रान पठाण, उपसरपंच सुलतान पठाण, मोहम्मद इनामदार, गुड्डू पठाण, मुस्लिम संघाचे जिल्हाध्यक्ष शिराज देशमुख, सिरसाळा सेवा सहकारी सोसायटी चेअरमन नदीम भाई, जावेद पत्रकार, अशोक गलांडे, तंटामुक्त अध्यक्ष गाव समिती सिरसाळा अयोसोद्दीन इनामदार, विद्यार्थी आघाडी बीड जिल्हा अध्यक्ष शेख राजू, इरफान बॉस, रफिक बागवान आदी उपस्थित होते. त्याचबरोबर जळगव्हाण येथील नवनिर्वाचित सरपंच संदीप वसंतराव चव्हाण यांसह राजाभाऊ सपकाळ, सुभाष जाधव, अमोल जाधव, उद्धवराव जाधव, कैलास क्षीरसागर, प्रल्हाद पंडित, शिवाजी राठोड, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश चव्हाण, रामजी चव्हाण, लक्ष्मण राठोड, विश्वनाथ आडे, उद्धव सोळंके यांसह आदी उपस्थित होते.

मरळवाडी चे मयत सरपंच बापू आंधळे यांच्या पत्नी व नवनिर्वाचित सरपंच श्रीमती दीपाली बापुराव आंधळे यांच्या सह उपसरपंच वाल्मीक आघाव, चेअरमन हनुमान आंधळे, त्र्यंबक फड, विष्णू आंधळे, बाळासाहेब फड, संतराम आंधळे, परमेश्वर फड, बापुराव फड, अश्रूबा आघाव, तुकाराम व्हावळे, शिवाजी फड यांसह पदाधिकारी आदींनी जगमित्र कार्यालयात उपस्थित राहून विजयाचा जल्लोष साजरा केला.

## दोन महिन्यानंतरही अल्पवयीन मुलीचा नेकनुर पोलिसांना शोध लागेना

**महाराष्ट्र दिनी पालकमंत्र्याच्या गाडीवर टमाटे फेकण्याचा पालकांचा इशारा**

**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कानडी घाट येथील अल्पवयीन मुलगी गेल्या दोन महिन्यापासून बेपत्ता असून सदरील मुलीला अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची तक्रार गेल्या दोन महिन्यापूर्वी नेकनूर पोलीस ठाण्यात मुलीच्या पालकांनी तक्रार दिली आहे. अल्पवयीन मुलीला फुस



लावून पळवून नेलेल्या आरोपीचे नाव पोलिसांना मुलीच्या पालकांनी सांगूनही पोलिसांनी अद्याप पर्यंत मुलीचा शोध लावलेला नाही. त्यामुळे मुलीच्या पालकांनी २८ एप्रिल मंगळवार रोजी नेकनूर पोलीस स्टेशन, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, पोलीस उपअधीक्षक केज, जिल्हा पोलीस अधीक्षक बीड, तहसीलदार बीड, जिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदन देऊन त्या निवेदनात असे म्हटले आहे की, नेकनूर पोलीस ठाण्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी तालुक्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत आ. सुरेश धस यांचे वर्चस्व

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत आमदार सुरेश धस यांच्या गटाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व अधोरेखित केले आहे. तालुक्यातील विविध गावांमध्ये धस समर्थक उमेदवारांना मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विजयी केले, त्यामुळे स्थानिक राजकारणात त्यांच्या गटाची मजबूत पकड कायम असल्याचे



चित्र स्पष्ट झाले आहे.

सावरगाव घाट (मायंबा) येथील सरपंचपदासाठी झालेल्या निवडणुकीत सौ. मनिषा कैलास चंदनशिव यांनी तब्बल ७४ मतांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयामुळे गावपातळीवर धस गटाचे संघटन आणि जनाधार अधिक बळकट झाल्याचे दिसून आले. तसेच सुलेमान देवळा ग्रामपंचायतीच्या सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत शिवम दिगंबर घोडके यांनी विजयी झाले आहे. या दोन्ही निकालांमुळे आष्टी तालुक्यात आमदार सुरेश धस यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## अनोळखी इसमाचा मृत्यू: ओळख पटवण्याचे पोलिसांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोलापूर-धुळे महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना २८ एप्रिल २०२६ रोजी घडली असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन बीड ग्रामीण पोलीसांनी केले आहे. या बाबत, सरकारी दवाखाना, बीड येथुन एम.एल.सी क्र.५२४६ दि. २८-०४-२०२६ अन्वये प्राप्त झाली की, बीड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत सोलापुर धुळे माहामार्ग रोडवर एक अनोळखी इसम वय-३५ ते ४० वर्ष नाव गाव माहीत नाही. यास अज्ञात वाहनाने धडक देवुन त्यांचे अंगावरुन गाडी गेली असावी. त्यामुळे सदर अनोळखी इसमाच्या प्रेताचा



चेंदामेंदा झालेला आहे. सदरील मृत इसमाची अद्याप ओळख पटलेली नसून, पोलिसांकडून ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. संबंधित मृत इसमाच्या अंगावर नाईट पॅन्ट असून त्यावर इंग्रजीत Kill Will असे अक्षर दिसत आहे. तसेच त्याने निळ्या रंगाचे कपडे परिधान केले असून पायात Filer कंपनीचे सँडल असल्याचे दिसून येत आहे. या घटनेप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. या बाबत काही माहिती असल्यास किंवा कोणी मिसींग किंवा कसे असेल बीड ग्रामीण पोलीस स्टेशन फोन क्र. ०२२४४२, ०२२२४२२ चौकशी अमंलदार मो. क्र.९८२२३४२०८२, प्रभारी अधिकारी मो.न. ७७२२०३५२०९ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन बीड ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

## इस्कॉन तर्फे बाल उत्सव साजरा



**बीड । प्रतिनिधी**

सावता माळी चौकातील श्री राधा गोविंद मंदिर या ठिकाणी २३ एप्रिल ते २९ एप्रिल ते यादरम्यान लहान मुलांसाठी हरे कृष्ण बाल उत्सवाचे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

बीड शहरातील लहान मुलांनी या पाच दिवशी शिबिरामध्ये बाल संस्कार वर्ग, चित्र रंगवणे स्पर्धा, सूर्यनमस्कार, श्लोक उच्चारण, अध्यात्मिक वेशभूषा स्पर्धा, प्राणायाम यावर प्रशिक्षण घेतले. विशेष करून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, समाजसेवा, स्वच्छता, समाजामध्ये कसे वागावे त्याचबरोबर आपल्या मधील वाईट गुणांवर मात करून चांगल्या गुणांचा कसा विकास करावा, यावरती श्रीमान कृष्णनाम प्रभू, रसिका दासी, वीरजा गोपी देविदासी व एकता शर्मा आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बुधवार दिनांक २९ एप्रिल रोजी शिदोड येथील महालक्ष्मी मंदिरामध्ये सर्व विद्यार्थ्यांची सहल आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील देवस्थानांची माहिती देऊन त्यांचे पावित्र्य कसे राखावे याविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात आले.अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

## मुस्लिमांच्या विकास योजनांवर सुनेत्राताई पवार कटिबद्ध

**मुलींचे वसती गृह व मार्टी साठी ठाम भूमिका : शेख निजाम**

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आज आयोजित करण्यात आलेली बैठक सकारात्मक आणि परिणामकारक चर्चेसह यशस्वीरीत्या संपन्न झाली.

यावेळी शिक्षण, कौशल्य विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही देत, चेंबूर येथील अणुशक्तीनगर परिसरात व बीड येथील अल्पसंख्याक मुलींसाठीच्या प्रस्तावित मुलीचे



वसतिगृह व जागा उपलब्ध करून कामाला गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले मा.आमदार विजयसिंह पंडित, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, शेख मुजीबभाई,फारुख पटेल, भागवत तावरे यांच्या सतत पाठपुरावा चालु आहे. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राज्य सरकार विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असून या प्रयत्नांना अधिक गती देण्यात येणार आहे. विशेषतः मुलींच्या उच्च तांत्रिक शिक्षणासाठी दर्जेदार सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित केले. या बैठकीत ‘मार्टी’ संस्थेशी संबंधित विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संस्थेसाठी स्वतंत्र लेखा उघडणे, कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## दिवसाढवळ्या बीड शहारातून वृद्ध महिलेची दागिने चोरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात मागील काही महिन्यापासून वृद्ध व रस्त्यावरून एकट्या जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोने चोरीच्या घटना घडल्या आहेत यामुळे महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. दागिने चोरी होण्याच्या घटना शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत घडत असल्याने दागिने चोरणारी टोळी सक्रिय आहे का?असा प्रश्न सर्वसामान्य पडला आहे. बीड शहरातील नगर नाका परिसरात एका वृद्ध महिलेची फसवणूक करून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. देवईबाई किसन बेद्रे (वय ७५, रा. निरगुडी, ता. पयेऱात्री) या घरकाम करून उदरनिर्वाह करतात. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ एप्रिल रोजी त्या पूर्णवादी बँकेत एफडीची मुदत वाढविण्यासाठी बीड येथे ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहरात अवैध बांधकामांचा सुळसुळाट

**लेखी तक्रार देऊन देखील करवाई नाही,आजू बाजूच्या इमारती कोसळून दुर्घटना झाल्यास नगरपालिका प्रशासन जबाबदार**

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट वाढत असताना नगरपालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून तीव्र होत आहे.

बीड शहरामध्ये जागोजागी अनधिकृत बांधकाम राजरोस सुरु असून नियमाची ऐशी की तैशीहोत असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. सोमेश्वर नगरमधील



रहिवाशांनी सन्दर नगर, बाशी रोड येथील सर्व्हे नं. ३६, गट क्र. ३ मधील सुमारे २१७० चौ. फूट जागेवर सुरू असलेल्या अपार्टमेंट बांधकामाविरोधात नगर परिषदेकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. केवळ ३० फूट रस्त्यालगत आणि अपुऱ्या जागेत सुरू असलेल्या या बांधकामामुळे परिसरातील इमारतींना धोका निर्माण झाला असून खोल पाया खोदकामामुळे बांधकामाच्या तिन्ही बाजूच्या इमारती खचण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच, समोरासमोर असलेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. परिसरात आधीच नाले व्यवस्था अपुरी असल्याने सांडपाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सदरील अपार्टमेंट बांधकाम सुरू असताना पाया नाली मध्येच कॉलम गेल्याची देखील दिसत आहे. अशा स्थितीत नव्या अपार्टमेंटमुळे हा प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. बार्शी रोड परिसरासह बीड शहरातील अनेक भागात हॉटेल्स,दवाखाने, लॉज व इतर व्यावसायिक इमारती नियमांची पायमल्ली करून उभारल्या जात असल्याचे आरोप होत आहेत. शेकडो अनधिकृत बांधकामे व शेडचे काम सुरू असतानाही नगरपालिकेकडून एकावरही ठोस ▶▶ उर्वरित पान २ वर